**Indian Streams Research Journal**
**Vol -3 , ISSUE –6, July.2013**
**ISSN:-2230-7850**
Available online at www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# श्रीकांत देशमुख्र यांच्या कवितेतील कृषिवेदना

## सुनिल लोंढे

**शोध सारांष**

श्रीकांत देशमुख हे नव्वदोत्तर ग्रामीण कवितेमधील एक लक्षणीय कवी आहेत. आधीच्या पिढीतील कवींनी केलेले ग्रामीण भागाचे रोमँटिक चित्रण टाळून त्यांची कविता बदलत्या ग्रामीण वास्तवाची परखड चिकित्सा करताना दिसते. बळिवंत आणि आषाढमाती या दोन्ही कवितासंग्रहामधील त्यांची कविता आधुनिक जाणीवेची आहे. महेंद्र कदम म्हणतात, "परंपरा पचवून सशक्त आधुनिक जाणिवा व्यक्त करणारी श्रीकांत देशमुखांची कविता एकूणच कवितेमध्ये (केवळ ग्रामीण नव्हे) वेगळेपण घेऊन आलेली आहे."[१] म्हणूनच ती एकूणच मराठी कवितेची कक्षा रुंदावणारी कविता ठरताना दिसते.

**प्रस्तवाना –**

वास्तविक पाहता भारत हा कृषिप्रधान देश, पण जागतिकीकरणानंतर तो व्यापारप्रधान झाला. प्रत्येक गोष्टीमध्ये नफा शोधण्याची प्रवृत्ती सर्व क्षेत्रात वेगाने फोफावली. ग्रामीण भागाचे अस्तित्व धोक्यात आले. शेती आंतरराष्टीय व्यापारासाठी खुली झाल्याने शेतकऱ्यांसमोर मोठे आव्हान निर्माण झाले. अशातच आपल्या देशातील भौगोलिक परिस्थिती, निसर्गाची प्रतिकूलता यामुळे कृषिक्षेत्राची पडझड होऊ लागली. या पडझडीचे भेदक चित्रण श्रीकांत देशमुखांची कविता करताना दिसते.

दिवसेंदिवस ओसाड होत जाणाऱ्या गावाचे चित्रण करताना ते एका कवितेत म्हणतात,

फूल कोमेजावे तसा गाव कोमेजू लागतो

आता वाराच आहे रक्त पाणी घरदार संसार

आहे वाराच भाकर आहे वारा माती

वारा सर्वा आहे नाही भाकर पोटात.

(बळिवंत, पृ.२५)

गावाचे गावपण उरले नाही. रोजगारासाठी होणाऱ्या स्थलांतराने गावाचा आत्माच हरवला. उरलेल्या माणसांमध्येही ओलावा उरला नाही आणि मग देशमुखांच्या कवितेतील गाव एकांतात आकांत करत राहतो.

कणसांचा संबंध

असतो आतडयांशी

गावमाणसांच्या कातडयाशी

कणसं नासली काजळली की

गाव रडतो एकांतात.

(बळिवंत, पृ.२७)

विशेषत: अलीकडच्या दोन दशकांत शेती हा बेभरवशाचा खेळ बनलेला दिसतो. त्यामुळे ग्रामीण भागातील शेतीवर उपजीविका असणाऱ्या कृषिवलांचीद अवस्था अत्यंत दयनीय झाली. शेतात राब राब राबायचे आणि हाती मात्र काहीच नाही. देशमुखांच्या अनेक कवितांमधून अशी चिपाड झालेली माणसे भेटतात. एका कवितेत ते लिहितात,

माणसं झालेली नागवी

पाण्यावाचून झडून गेलेल्या

पानगळल्या झाडासारखी

वाळक्या पायाच्या रेघोटया ओढीत

आयुष्य लोटणारी गुरंढोरं सर्वदूर.

(बळिवंत, पृ.१८)

वठलेल्या झाडासारखी माणसं, सूर हरवलेल्या बासरीसारखी पांदीची वाट, टिचलेले गुराख्यांचे आवाज अशा करुन प्रतिमांमधून देशमुख कृषिजीवनाला आलेली अवकळा अधोरेखित करतात. नागनाथ कोत्तापल्ले म्हणतात, "कष्ट आणि कष्टांतून काही तरी उभे राहणे हे येथील जीवनाचे सूत्रच नाही. हा अंतर्विरोध श्रीकांत देशमुख यांच्या कितीतरी कवितांतून प्रत्ययकारी होऊन जातो. गावाचे, गावातील माणसांचे विद्रूप वैराणपण त्यांच्या प्रतिभेला साद घालित राहते. मग आपण, आपले कुटुंब आणि भोवतीची सारीच माणसे कुठल्यातरी अनामिक आगीत जळत राहतात. याची अनुभूती त्यांच्या कवितेतून प्रकट होते."[२]

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या वाटयाला आलेली ही विवंचना एका कवितेत उपरोधिक शब्दात मांडताना ते लिहितात,

आम्ही पेरला आत्मा

पावसाला कळलं नाही

भर पावसात वैराण झालो

मरणाला बांधून आलो

सरणाला कळलंच नाही.

(बळिवंत, पृ.५२)

हा उपरोध पुढे इतका तीव्र होतो की एका कवितेत ते लिहितात,

पेरणीनंतर बापानं

सहज स्मशानातून

फेरी मारली

ओल्या रानासोबत

सालभर

मरणाची तयारी केली.

(बळिवंत, पृ.३८)

कृषिक्षेत्रातील अनिश्चितता अत्यंत उपरोधिक शब्दात वरील कवितेतून प्रकट झालेली दिसते.

श्रीकांत देशमुखांच्या कवितेतील आई ही प्रातिनिधिक स्वरुपात येताना दिसते. स्त्रिलाही ते तितकेच महत्वपूर्ण स्थान देतात शेतीच्या व घरातील कामामधून तिला कधीच विश्रांती मिळत नाही. दुष्काळाशी झगडताना आईचे होणारे हाल, कष्ट करताना निसर्गाने दिलेली हुलकावणी तिला नवी नाही. श्रमाबरोबर आपली मुले बाळे हे मातृत्वाचे ओझे पण तिच्यावर आहे. एवढे असून सुध्दा आपली शेती, आपला पती, मुले, बाळे याबरोबरच प्राणी, पशु-पक्षी या सर्वांवर जीव गूंतवते. यामध्ये गूंतत गूंतत ती वृध्दावस्थेपर्यंत वाटचाल करते. पण मागे सरत नाही. तिच्या कष्टाला काळ वेळेच्या मर्यादा नसतात. ते लिहितात,

रान वाढत जाते

माय खंगत जाते

डोईवर

डंगरं आभाळ

काठी टेकत थरथरते.

(बळिवंत पृ.५१)

वेगवेगळया प्रयोगशीलतेतून देशमुख यांनी शेतकऱ्यांची दु:खे मांडलेली दिसून येतात. हे मांडताना त्यांनी अभंग या रचना प्रकारातून अतिशय अचूकपणे शेतकऱ्यांच्या प्रश्नांचा वेध घेतला आहे. अगदी सहजपणे त्यांची कविता मोठा आशय मांडून जाते आणि दुष्काळस्थितीची भयावह सदृशता आपल्यासमोर उभी करते ती अशी,

कुणब्याचे दु:ख

झालेय देखणे

आभाळ उताणे पाठीवर

उरलेले भोग

भोगोनिया सारे

अवघे किनारे ढासळले

(बळिवंत पृ.७३)

कवीचा स्वर हा विठ्ठलभक्तीपेक्षा वास्तव चित्रणावर अधिक आहे. वास्तवतेचं एक प्रखर रुप इथे देशमुखांनी चित्रित केले आहे. हा भाविक शेतात राबण्यापेक्षा विठ्ठलभक्तीकडे ओढला गेला आहे, मग हा विठ्ठल शेतकऱ्याला अन्न, पाणी देत नाही, पाऊसपाणी देत नाही. मग ही नुसतीच उठाठेव कशाला? असाही त्यांना प्रश्न पडतो.

एवढी भाव-भक्ती प्रकट करुन पण दुष्काळ पाठ सोडत नाही. त्यांची अभंग छंदातील कविता वाचताना विठ्ठला विषयी नकार, विद्रोह हा वारंवार जाणवतो. 'देवाचे राऊळ' या कवितेमध्ये 'सोडीन कासोटा विठ्ठला मी' असे कवी चिडून म्हणतो, तर 'चोखोबा सावता करा आता काम, विठ्ठलाचा घाम काडोनिया' असे पण परखड पणे म्हणतो.

भोळा खेडूत कुणबी हा विठ्ठलाकडे आषाढी-कार्तिकेला येतो पण त्याच्या शेतातील कामे कोण करणार म्हणूनच देशमुख उद्‌वेग व्यक्त करतात. इथल्या शेतकऱ्यांच्या हाल, अपेष्ठा कोण जाणणार, काढलेलं कर्ज कोण फेडणार? आषाढी वारी केली म्हणजे कर्ज फिटणार आहे का.... ?

ते म्हणतात,

विठ्ठलाचे नाव कशासाठी घ्यावे

नरडयाला दावे लागलेले

**Indian Streams Research Journal**
**Vol -3 , ISSUE –6, July.2013**
**ISSN:-2230-7850** Available online at www.isrj.net

विठ्ठलाने यावे राबावया रानी

फोडावया पाणी दंडातले

(आषाढमाती पृ.३९)

संपूर्ण व्यवस्थेविषयी नकार अन विद्रोह त्यांच्या अनेक कवितातून जाणवतो, 'विठू माझा लेकुरवाळा' मधील गावातल्या ज्ञानेश्वराचा मृत्यु झाला आहे. मुक्ताबाई वावरात उभी आहे. तिच्या लग्नासाठी शेत विकलं गेलंय. गोऱ्या कुंभाराच्या संसाराची माती झालीय. सावत्याचा मळा पाण्याविना वाळून गेलाय, चोखोबा हा आजच्या दलित चळवळीचा नायक आहे. चोखोबाने रिप्लेसमेंट केली आहे. त्याने देव्हाऱ्यातले देव जाळून भिमराव उभा केला आहे. लेकराला पाटी नाही ती घेण्यासाठी पैसा नाही म्हणून भांडणारी जिजाबाई म्हणतेय, देव माझ्यासाठी गाभूडला. तुकोबाचा मळा आता वाळून गेलाय हा तुकाराम वाणी आहे, कुणबी आहे. नाम्याच्या जणीला अर्ध्यारातीी गावानं भोगून पुरावा नष्ट करण्यासाठी जाळुन टाकलीय..... म्हणूनच ते संतापून विठ्ठलाला प्रश्न विचारतात,

तुझा संत मेळा असा कसा झाला.

अध्यात्माचा काला लोकशाही

(आषाढमाती पृ.३७)

संपूर्ण लोकशाहीचं रुपच ते संतमेळ्यातून प्रकट करतात, म्हणूनच त्यांच्या कवितेतील एक एक शब्द वास्तवतेचं जळजळीत निखारे घेऊनच बाहेर पडतात. यासंदर्भात रंगनाथ पठारे म्हणतात, "कवितेच सर्वोत्तम शब्दाची सर्वोत्तम व्यवस्था असणं झुगारुन देण्याच ठळकपणे नामदेव ढसाळांपासून आपल्या भाषेत सुरु झालं ते आज श्रीकांत देशमुख, अरुण काळे यांच्यापर्यंत सुरुच आहे. यापाठी एकीकडे सर्वोत्तम शब्दांच गुळ्गुळीत होण ही भावना आहे, तर दुसरीकडे अधिक महत्त्वाचे म्हणजे व्यवस्थेविषयी नकार, विद्रोह, प्रतिकार अशा भूमिका आहेत, आणि ही व्यवस्था फक्त कवितेतली नाहीय, कवितेसकट एकूण जीवनाची व्यवस्था, तिचं रुप यासंबंधात प्रतिक्रिया देताना या कवींना ते आवश्यक वाटलेलं आहे."[३]

एकूणच श्रीकांत देशमुख यांच्या कवितेतील कृषिजाणीवेविषयी थोडक्यात विशेष पुढील प्रमाणे सांगता येतील

१) श्रीकांत देशमुख यांची कविता आधुनिक जाणीवेची असून कृषिजीवनातील बदलत्या वास्तवाची ती नेमकी चिकित्सा करते.

२) जागतिकीकरणाच्या प्रभावाने ओसाड होत जाणारा गाव त्यांच्या कवितांमधून अत्यंत प्रत्ययकारी शैलीत सुक्ष्म तपशीलांसह रेखाटलेला दिसतो.

३) अनिश्चिततेच्या सावटामुळे कृषिक्षेत्राची झालेली दैन्यावस्था आणि त्यामुळे शेतकऱ्यांची झालेली शोचनीय स्थिती त्यांनी करुण शैलीत रेखाटलेली दिसते.

४) उपरोध, उपहास, प्रमाणकांचे विपथन यामुळे श्रीकांत देशमुख यांची कविता अभिव्यक्तीच्या पातळीवरही वैशिष्ट्यपूर्ण वाटते.

५) वास्तव अध्यात्म, संतमंडळी, कृषीपरंपरा, विठ्ठल भोवतीचा पसारा यावर परखड भूमिका घेत त्यांची कविता येते.

६) एकूणच श्रीकांत देशमुखांची कविता अलीकडच्या दशकातील कृषिसमूहाची वेदना जोरकसपणे चव्हाटयावर आणते. समस्येचे नेमके आकलन आणि अभिव्यक्तीमधील निराळेपण यामुळे समकालीन कवितेमध्ये त्यांची कविता अत्यंत लक्षवेधी ठरलेली दिसते.

**संदर्भग्रंथ**

१) कदम महेंद्र : कवितेची शैली, भूमी प्रकाशन, लातूर, प्र.आ.,२००७.

२) कोत्तापल्ले नागनाथ : बळिवंत या श्रीकांत देशमुख यांच्या काव्यसंग्रहातील परिशिष्टामधून.

३) पठारे रंगनाथ : 'उजळमाथ्यानं कुणबीपण मिरवणारी कविता' श्रीकांत देशमुख, यांच्या 'आषाढमाती' २००६ या काव्यसंग्रहातील लेख.